स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दु.क्र.०२०-२४४७६९३८
Email-
researchdept@maa.ac.in

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे**
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.

जा.क्र.राशैसंप्रपम/संशोधन/ TISS /२०२२-२३/१४१३ दि. २०/०३/२०२३

**प्रति,**

Prof. Padma Sarangapani,
Chairperson, Centre of Excellence in Teacher Education,
Tata Institute of Social Science

**विषय:** आपल्या संस्थेमार्फत हाती घेण्यात आलेल्या संशोधन अभ्यासास आवश्यक अटींच्या अधीन राहून परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :** टाटा सामाजिक विज्ञान संस्थान (TIIS) यांचे प्राप्त पत्र दि.२२ फेब्रु. २०२३

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये टाटा सामाजिक विज्ञान संस्थान (TISS) यांचेमार्फत अध्यापन कार्यक्रम, संशोधनाद्वारे अध्यापन व्यवसाय आणि शिक्षक शिक्षणाचे पुनरुज्जीवन करण्याच्या दिशेने काम करण्यासाठी CETE लॉंच करण्यात आले असल्याचे म्हटले आहे. तसेच **सन २०२३ मध्ये** Focus on Teacher availability at schools, supply and demand **या विषयावर संशोधन अभ्यास केला जाणार आहे.**

या संशोधन अभ्यासासाठी १० राज्यांतील शाळा आणि शिक्षक शिक्षण संस्थांकडील प्राथमिक माहिती संकलित केली जाणार आहे. यामध्ये शाळा (खाजगी, अनुदानित आणि सरकारी), शिक्षक शिक्षण संस्था (खाजगी, अनुदानित आणि सरकारी) आणि शिक्षण व्यवस्थेतील प्रमुख घटक यांचा अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षण संस्थांचे प्रमुख यांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. जिल्हा किंवा तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली जाणार असल्याचे संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे.

सदर संशोधन अभ्यास पूर्ण करण्यास व महाराष्ट्र राज्यातील नंदुरबार, गडचिरोली आणि मुंबई जिल्ह्यांतील सुमारे १२० शाळा आणि ३० शिक्षक शिक्षण संस्था (TEIs) यांना सहभागी करून मार्च व एप्रिल २०२३ मध्ये माहिती संकलन करण्यास तसेच सदर माहिती संकलन प्रक्रियेत मार्गदर्शन आणि सहाय्य करण्यासाठी जिल्हानिहाय नोडल अधिकारी नियुक्त करून त्यांची नावे कळविण्याबाबत विनंती केली आहे.

**त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, सदर संशोधन अभ्यास हाती घेण्यास व त्यांतर्गत माहिती संकलन करण्यास पुढील अटी व शर्तींच्या आधारे परवानगी देण्यात येत आहे.**

१. सदर संशोधनाचा कोणताही आर्थिक भार शासन, विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यावर असणार नाही किंवा भविष्यात याची मागणी करता येणार नाही.
२. संशोधनाची कार्यवाही आणि प्रगती होत जाईल त्याप्रमाणे संशोधनाच्या प्रत्येक टप्प्यावर परवानगी घेण्यात यावी. तसेच यापूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.
३. माहिती संकलन साधनाची विभागाकडून / तज्ज्ञ व्यक्तीकडून सप्रमाणता तपासून घेण्यात यावी. तसेच प्रमाणित केलेली प्रत या कार्यालयास सादर करावी.

४. माहिती संकलन करण्यापूर्वी माहिती विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याची पद्धत याबाबतची माहिती कार्यालयास देणे आवश्यक आहे.

५. संशोधनामधील माहिती संकलन करण्यापूर्वी नंदुरबार, गडचिरोली आणि मुंबई जिल्ह्यातील निवडलेल्या शाळा व शिक्षण संस्थांची यादी या कार्यालयास कळविण्यात यावी.

६. माहिती संकलन करणाऱ्या सर्व क्षेत्रीय अन्वेषकांची यादी (नाव, संपर्क क्रमांक) या कार्यालयास सादर करावी.

७. माहिती संकलन करण्यासाठी गेल्यानंतर संबंधितांनी आपले ओळखपत्र संबंधित शाळेतील मुख्याध्यापक यांना दाखविणे बंधनकारक राहील.

८. संकलित केलेल्या माहितीचा उपयोग केवळ संशोधनासाठीच करण्यात यावा. माहितीचा गैरवापर होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

९. संशोधनाचा अहवाल प्रकाशित करण्यापूर्वी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

तसेच सदर संधोधन अभ्यास पूर्ण करण्यास व त्यांतर्गत माहिती संकलन प्रक्रियेत मार्गदर्शन आणि सहाय्यासाठी पुढीलप्रमाणे जिल्हानिहाय नोडल अधिकारी यांच्याशी वेळोवेळी संपर्क करण्यात यावा.

| अ.क्र. | नोडल अधिकाऱ्याचे नाव | पद | कार्यालय | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. मनिषा पवार | उपसंचालक | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई | ९४२३४६५६२४ |
| २ | डॉ. जगराम भटकर | प्राचार्य | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार | ९४२३७२८४८६ |
| ३ | डॉ. विनित मत्ते | प्राचार्य | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गडचिरोली | ९४२२१५१२८८ |

मा. संचालक यांचे मान्य टिपणीनुसार.

(रमाकांत काठमोरे)
सहसंचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे ३०.

प्रत माहितीस्तव :

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत कार्यवाहीस्तव:

१. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई
२. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार व गडचिरोली
३. शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक, मुंबई, नंदुरबार व गडचिरोली